# १२ मला मोठ्ठं व्हायचंय!

**प्रियंवदा करंडे**–(जन्म–१९४६) बाल, किशोर व कुमारवयीन मुलांसाठी लेखन करणाऱ्या कवयित्री व कथा लेखिका. ‘स्वामी विवेकानंद’ (चरित्र), ‘ज्ञानेश्वरांच्या गोष्टी’, ‘मी नाही जा आणि इतर गोष्टी’ (बालकथा संग्रह)’ आणि ‘हिरोंच्या शोधात’, ‘बाई आणि टेलिफोन’, ‘कविता जन्माला येतेय’ (एकांकिका), ‘जरा ऐकताय ना...’ (नाट्यछटा) इत्यादी साहित्य प्रकाशित.

मुलाला शास्त्रज्ञ व्हायचंय, शोध लावायचे आहेत, त्यासाठी तो तयारी करत आहे; परंतु घरातील सगळेजण त्याच्या कामात व्यत्यय आणतात. त्या मुलाच्या मनातील विचार या नाट्यछटेतून सांगितले आहे.

- शास्त्रज्ञ व त्यांनी लावलेले शोध यांच्या योग्य जोड्या लावा.

| | ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|---|
| (अ) | गॅलिलिओ | १. विमान |
| (आ) | जेम्स वॅट | २. दुर्बिण |
| (इ) | राईट बंधू | ३. वाफेचे इंजिन |

माणसानं ध्येय धरावं ते आकाशाला गवसणी घालण्याचं! खडकातून पाणी काढण्याचं! काय म्हणतेस



आई? नळाचं पाणी जाईल? अंघोळ करून घेऊ? अगं पण... काय? खडकातून पाणी नंतर काढू? बरं बाई! म्हणतात ना, थोर पुरुषांच्या कार्यात अनंत अडचणी उभ्या असतात. मला शास्त्रज्ञ व्हायचंय. संशोधन करायचंय. शोध लावायचेत; पण आईला मला अंघोळीला पाठवायची घाई लागलीय! आता सांगा, न्यूटनला जर अशी घाई कुणी केली असती, तर गुरुत्वाकर्षणाचा शोध लावू शकला असता का तो? सफरचंद खाली पडताना त्यानं पाहिलं, तेव्हा त्याच्या मनात आलं, की हे सफरचंद खालीच का पडलं? वर का गेलं नाही? काय म्हणतेय ताई? मला वर फेकलं तर मीदेखील खालीच पडेन धाडकन? बरं बरं! तर काय सांगत होतो, न्यूटन झाडाखाली बसून शांतपणे विचार करत असताना असा त्याच्या ताईनं, आईनं, आजीनं त्रास दिला असता, तर त्याला शोध लावता आला असता का? नाही ना! आता मीदेखील वैज्ञानिक शोध लावण्यासाठी घरात माझी लॅब बनवली आहे. मायक्रोस्कोप, टेस्टट्यूब्ज, काचेची पात्रं. सगळं सगळं आणून ठेवलंय! पुस्तकांचा तर डोंगरच रचलाय! आता पुस्तकं उघडून वाचायचं तेवढं काम आहे. टिपणं काढण्यासाठी कागदांचे ताव आणलेत. शाईच्या बाटल्याही तयार ठेवल्यात. काय म्हणतेस आई? आत्ताच्या आता अंघोळीला उठू, नाहीतर पाणी जाईल आणि मला त्या बाटल्यांतल्या शाईनं अंघोळ करावी लागेल? उद्या मी मोठ्ठा शास्त्रज्ञ

झालो की हीच ताई, हीच आई मिरवणार माझ्या बक्षीस-समारंभात! काय ग ताई? चिडतेस कशाला? शास्त्रज्ञ होणं म्हणजे इतकं सोपं नाही काय? असू दे! माझा निश्चय दांडगा आहे. मी शास्त्रज्ञ होणारच; पण आता कुठला शोध लावू बरं? या आधीच्या शास्त्रज्ञांनी तर सगळेच शोध लावलेत, माझ्यासाठी काही काम शिल्लक ठेवलंय असं वाटत नाही. लसीकरण, अणू, परमाणू, विद्युतशक्ती... आता मी कसला बरं शोध लावू? काय म्हणतेस आई? माझी निळी पँट शोधू? कपड्यांच्या बोळ्यांतसुद्‌धा तू शोधलीस? काय? निळी पँट शोधली, तर हाच मोठा शोध लावला मी! असं म्हणतेस? आईवर खूप उपकार होतील! आता कळतं, की शास्त्रज्ञांना त्यांचे शोध लावताना किती त्रास, मनस्ताप सहन करावा लागला ते !

## स्वाध्याय



**प्र. १. दोन-तीन वाक्यांत प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) मुलाला अंघोळीला न जाता काय करायचे आहे?

(आ) वैज्ञानिक शोध लावण्यासाठी मुलाने कोणती तयारी केली ?

(इ) शास्त्रज्ञ झाल्यावर ताई व आई काय करतील असे मुलाला वाटते?

(ई) आई मुलाला कोणता शोध लावायला सांगते?

**प्र. २. मनाने उत्तरे लिहा.**

(अ) कोणत्या गोष्टींसाठी आई तुमच्या सारखी मागे लागते?

(आ) तुम्हांला अंतराळात सोडले तर तुम्ही काय काय पाहाल ते लिहा.

(इ) तुम्हांला कोणते शोध लावावे असे वाटते ?

**प्र. ३. (अ) वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

(अ) आकाशाला गवसणी घालणे.
(इ) खडकातून पाणी काढणे.
(आ) निश्चय दांडगा असणे.
(ई) मनस्ताप सहन करणे.

**(आ) पाठात आलेले शब्द खाली दिलेले आहेत. त्यांची माहिती मिळवा व लिहा.**

(अ) गुरुत्वाकर्षण
(इ) लॅब
(उ) अणू
(आ) टेस्टट्यूब्ज
(ई) विद्युतशक्ती
(ऊ) परमाणू

**(इ) प्रयोग करण्यासाठी प्रयोगशाळेमध्ये विविध साहित्य असते, त्याची यादी करा.**

**(ई) तुम्ही आतापर्यंत पाठांचे विविध नमुने अभ्यासले आहेत, त्यांपैकी खाली काही नमुने दिले आहेत त्यांमध्ये जास्तीत जास्त व कमीत कमी किती पात्रे बोलत असतात ते खालील तक्त्यात लिहा.**

| नाट्यछटा | संवाद | नाट्यप्रवेश | आत्मवृत्त | कथा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**शिक्षकांसाठी :** या नाट्यछटेतील घटना, वाक्ये व आवाजातील योग्य चढउतार लक्षात घेऊन विद्यार्थ्यांकडून वाचन करून घ्यावे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करावे.

(उ) या नाट्यछटेत किती पात्रांचा उल्लेख आहे? ती पात्रे काय बोलली आहेत ते लिहा.

**उपक्रम :** (१) 'मला मोठ्ठं व्हायचंय' ही नाट्यछटा स्नेहसंमेलनाच्या वेळी वर्गात सादर करा.

(२) 'दिवाकरांच्या नाट्यछटा' हे पुस्तक मिळवून वाचा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील शब्द वाचा.**

मी, ही, जी, पी, बी, ती, तू, धू, जू, ऊ, पू हे एकाक्षरी शब्द आहेत.

**एकाक्षरी शब्दांतील इ-कार किंवा उ-कार दीर्घ उच्चारला जातो म्हणून तो 'दीर्घ' लिहितात.**

**'नि' हा एकच शब्द असा आहे की जो एकाक्षरी असूनही 'ऱ्हस्व' लिहितात.**

- **खालील वाक्ये वाचा. अधोरेखित शब्दांचे निरीक्षण करा.**

१. <u>त्याची</u> <u>टोपी</u> <u>उडाली</u>.

२. नूरजहाँ <u>विटी</u>-<u>दांडू</u> <u>खेळू</u> <u>लागली</u>.

३. आईने <u>पिशवी</u> <u>ठेवली</u>.

४. ताईला <u>पेरू</u> आवडतो.

५. <u>संजू</u> आनंदाने <u>नाचू</u>, <u>बोलू</u> आणि <u>गाऊ</u> <u>लागला</u>.

त्याची, टोपी, उडाली, विटी, दांडू, खेळू, लागली, पिशवी, ठेवली, पेरू, संजू, नाचू, बोलू, गाऊ या शब्दांतील 'इ-कार' व 'उ-कार' दीर्घ आहेत. मराठी भाषेत शब्दांच्या शेवटी येणारे 'इ-कार' व 'उ-कार' दीर्घ असतात. 'आणि' व 'परंतु' हे मराठीतील दोन शब्द असे आहेत की ज्यांचा 'इ-कार' व 'उ-कार' ऱ्हस्व लिहितात.

- **शब्दांच्या शेवटी 'इकार' किंवा 'उकार' येतील असे दहा शब्द लिहा.**

- **खालील वाक्यांतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या सार्वनामिक विशेषणांपैकी योग्य विशेषण घाला.**

(इतका, जेवढा, तुमचा, तिचा, जसा, तेवढे)

१. बाबांनी विचारले, "......... वेळ कुठे होतास?"

२. ......... चेहरा उन्हाने लालेलाल झाला.

३. मला वाटते, " ......... कचरा जास्त ......... प्रदूषण जास्त."

४. ......... मुलगा खूप हुशार आहे.

५. ......... अंगरखा तशीच टोपी घालून तो मंचावर आला.

- **खालील नामांना दोन-दोन विशेषणे लिहा.**

उदा., हिमालय-उंच, बर्फाच्छादित.

१. भाजी - ......... , .........

२. घर - ......... , .........

३. विद्यार्थी - ......... , .........

४. बाहुली - ......... , .........

५. लोक - ......... , .........

**शिक्षकांसाठी :** शुद्धलेखनाच्या नियमांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून उपयोजनात्मक सराव करून घ्या.